मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मराठा आंदोलनाला पाठिंबा; आज मोशी बंद!

## ग्रामस्थांचे नागरिकांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**मोशी। न्यूज एक्स्प्रेस मराठी ।** मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी जालना येथे आंदोलन सुरू आहे. त्या ठिकाणी मराठा आरक्षणासाठी शांततेत उपोषण करणाऱ्या समाज बांधवांवर पोलीस प्रशासनाने अमानुष लाठीहल्ला केला. याच्या निषेधार्थ मोशी गावात उद्या दि. ९ सप्टेंबर रोजी बंद पुकारण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण सुरू आहे. उपोषणाचा आज ११वा दिवस असून, आंदोलक मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीवर ठाम आहेत. याचे पडसाद आता पिंपरी-चिंचवडमध्ये दिसू लागले आहेत. मराठा क्रांती मोर्चा आणि समस्त ग्रामस्थ मोशी यांच्या वतीने मोशी बंद पुकारण्यात आला आहे. मराठा समाजाला सामाजिक,




आर्थिक मागासलेले पण असलेल्यांना ओबीसी प्रवर्गात आरक्षण द्यावे. राज्य मागासवर्गीय आयोगातील त्रुटी दूर करून शिफारशी लागू कराव्यात ही सकल मराठा समाजाची मागणी आहे.

मराठा समाजाने सरकारकडे अनेक दिवसांपासून ही मागणी केली आहे. त्याचसोबत मराठा तरुणांचे प्रश्न आहे. एमपीएससीचे प्रश्न आहेत. मराठा शेतकरी बांधवांचे प्रश्न या सर्वांवर सरकारने निर्णय घ्यायला हवा अशी मराठा समाजाची मागणी आहे. त्यामुळे मराठा समाजावर सनदशीर मार्गाने आंदोलन करीत असताना झालेला लाठीहल्ला ही निषेधाची बाब आहे, अशी खंत ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच, मोशी बंदमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# मोशी ते श्रीक्षेत्र भीमाशंकर पहिली कावड यात्रा उत्साहात!

## ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : सुमारे ४०० शिवभक्तांचा सहभाग



**मोशी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे जिल्ह्यात पहिल्यांदाच मोशी ते श्रीक्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग कावड यात्रा-२०२३ उत्साहात झाली. या यात्रेमध्ये ग्रामस्थ आणि शिवभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. भीमाशंकर सोडून इतर सर्व ज्योतिर्लिंगांना कावड यात्रेची प्रथा आहे. परंतु, आजपर्यंत कोणीही भीमाशंकर येथे कावड यात्रा नेली नव्हती. मोशी, च-होली, चिखली, डुडुळगाव या परिसरातून प्रथमच पायी कावड यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे, खेड आळंदीचे आमदार दिलीप मोहिते, माजी महापौर नितीन काळजे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, संजय घनवट तसेच समस्त मोशी, च-होली, जाधववाडी-डुडूळगाव ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. या यात्रेत मोशी व आजूबाजूच्या परिसरातून तब्बल ४०० शिवभक्त दाखल झाले होते. दिनांक २ सप्टेंबर रोजी पहाटे पाच वाजता डीजेच्या तालावर श्री नागेश्वर महाराज मंदिर मोशी येथून पायी कावड यात्रेला प्रारंभ झाला. शिरगाव ते भोरगिरी सुमारे १० किलोमीटर आमदार महेश लांडगे यांनी खांद्यावर कावड घेऊन कावड यात्रेत सहभागी दर्शवला. शिवभक्त आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात शिव शंभो हर हर महादेव, जय श्रीराम तसेच छत्रपती शिवाजी श्री महाराज की जय, छत्रपती श्री संभाजी महाराज की जय, हिंदूधर्म की जय, हिंदू राष्ट्र की जय अशा घोषणांनी भोरगिरीचे घनदाट जंगल दणाणून निघाले.

### इंद्रायणी- भामाचे जल भीमाशंकराला अर्पण

» श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग येथे कावड पोहोचल्यानंतर मोशी आणि चरोली भागातून आणलेल्या कावडचे पूजन श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग चे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे यांच्या हस्ते करण्यात आले. पिंपरी- चिंचवड शहराचे माजी महापौर श्री नितीन काळजे आणि पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, विश्वस्त मधुकर अण्णा गवांदे, दत्तात्रय कौदरे, मुख्य व्यवस्थापक चंद्रकांत कौदरे, उपसरपंच गोरक्ष कौदरे, अंकुश कौदरे, आत्माराम कौदरे तसेच इतर पुजारी वर्ग उपस्थित होते. पूजा तसेच आरती झाल्यानंतर सर्व शिवभक्तांना श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग संस्था तर्फे विशेष दर्शनाची सोय करण्यात आली होती. सर्व शिवभक्तांनी कावड मध्ये आणलेले इंद्रायणी-भामा नदीचे जल शिवलिंगावर अर्पण केले आणि यात्रेची सांगता केली. तसेच, हिंगणे सरकार नगर येथील महादेव मंदिर मोशी येथे विधीवत कावड ची मिरवणुक काढून कावड नाचविण्यात आली त्यानंतर आरती करून नागरिकांना महाप्रसाद देवून कावड यात्रेचा समारोप करण्यात आला.

# मोशीत साईनाथ मंडळाची दहीहंडी जल्लोषात!

## माजी नगरसेवक वसंत बोराटे यांचा पुढाकार; २५ गोविंदा पथकांचा सहभाग

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मोशी येथील साईनाथ मित्र मंडळाच्या वतीने यंदाचा दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. हा उत्सव पिंपरी-चिंचवडमधील सर्वात मोठा दहीहंडी उत्सव म्हणून ओळखला जातो. माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते वसंत बोराटे यांच्या



पुढाकारो प्रतिवर्षी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते.

यंदा उत्सवाचे १५ वे वर्ष होते. मोशी- देहुरस्ता येथील अंशूल कॉसमास ग्राउंड, अनंतनगर येथे उत्सवाचे आयोजन केले होते. यावर्षी शुभविवाह फेम अभिनेत्री मधुरा देशपांडे, बॉलिवूड-टॉलीवूड अभिनेत्री राशी खन्ना, मुरंबा फेम अभिनेत्री शिवानी मुंढेकर दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण होत्या. परिसरातील नागरिकांनी उत्सावाला प्रचंड गर्दी केली होती.

### बालवीर गोविंदा पथकाने फोडली हंडी

» माजी नगरसेवक वसंत बोराटे म्हणाले की, प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही दहीहंडी उत्सव दिमाखात साजरा करण्यात आला. एकूण २५ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. प्रत्येक मंडळाच्या सलामीला आम्ही रोख बक्षीस दिले. मानाची हंडी फोडणाऱ्या पथकाला आकर्षक बक्षीस देण्यात आले. चाकण येथील बालवीर गोविंदा पथकाने यंदाची हंडी फोडली. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे उत्सव साजरा केल्याचे मोठे समाधान मिळाले.

# पालिकेत सनदी अधिकाऱ्याच्या नियुक्तीचा प्रस्ताव फेटाळला!

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदावर रेल्वे, राज्य वस्तु व सेवा कर विभाग आणि मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती होऊ लागल्याने भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी (आयएएस) अधिकाऱ्याचीच अतिरिक्त आयुक्तपदी प्रतिनियुक्ती करण्याची मागणी करणारा महापालिकेचा प्रस्ताव नगरविकास विभागाने फेटाळला आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून पूर्वीप्रमाणेच मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. नवीन आकृतीबंधानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरचे आणि महापालिका अधिकाऱ्यां करिता पदोन्नतीसाठी एक याप्रमाणे तीन पदांची विभागणी करण्यात आली. यापूर्वी महसूल सेवेतील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती होत होती. परंतु, मागील काही वर्षांत रेल्वे सेवेतील विकास ढाकणे, राज्य वस्तु व कर सेवेतील प्रदीप जांभळे, मुख्याधिकारी संवर्गातील विजय खोराटे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली. महापालिकेचे आयुक्त सनदी अधिकारी असतात. सर्वच विभागाचे अंतिम अधिकार आयुक्तांनाच असतात. त्यामुळे काही विभागाचे सर्व अधिकार आयएएस दर्जाच्या अतिरिक्त आयुक्तांना देता येतील. त्यामुळे आयुक्तांकडील ताण कमी होईल.

# आज पिंपरी-चिंचवड बंदची हाक!

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांकडून झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चाकडून शनिवारी (दि.९) पिंपरी-चिंचवड शहर बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदला शहरातील विविध राजकीय पक्ष, शेकडो संघटनांनी पाठिंबा दिला आहे. उद्या शनिवार (दि.०९) सकाळी १० वाजता पिंपरीगाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून डीलक्स चौक मार्गे मुख्य बाजार पिंपरी या मार्गाने महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जालना येथील घटनेच्या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चाचे सर्व समन्वयक यांची निषेध सभा होवून महामोर्चाची सांगता होणार आहे. या महामोर्चात पिंपरी-चिंचवड शहर बंदला जाहीर पाठिंबा देण्यासाठी शहरातील १८ पगड बारा बलुतेदार एकटवला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, जिजाऊ ब्रिगेड, मराठा महासंघ, मराठा छावा युवा संघटना, काँग्रेस पक्ष, शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, स्वराज्य संघटना, वंचित बहुजन आघाडी, स्वराज्य अभियान, राजमाता जिजाऊ ज्येष्ठ नागरी संघ, अपना वतन संघटना, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, छावा युवा मराठा महासंघ, आम आदमी पार्टी, एमआयएम, भिमशाही युवा संघटना, राष्ट्रवादी रिपब्लिकन पार्टी, भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समिती, फुले शाहू आंबेडकर विचार मंच, व्यापारी संघटना व मंडळे यांनी स्वयंस्फुर्तीने पाठिंबा दर्शवला आहे.

# कुमार प्रिंन्सविले फेज-२ मध्ये दहीहंडी उत्साहात!

## बालगोपाळांचा उत्साह : सांस्कृतिक समितीचा पुढाकार

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मोशी येथील कुमार प्रिंसविले फेस २ येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने कृष्ण जन्मोत्सव आणि दहीहंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये अबालवृद्धांनी सहभाग घेतला. लहान मुलांनी ''कृष्ण जन्म'' हे नाटक सादर केले. यासाठी सोसायटीच्या



सांस्कृतिक समितीने पुढाकार घेतला.भगवान कृष्णाच्या जन्माचा प्रसंग ज्याला जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी असेही म्हणतात. श्रावण महिन्यात कृष्ण अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. भारतीय संस्कृतीचा प्रतिक असलेला हा उत्सव सोसायटीतील नागरिकांनी अत्यंत मंगलमय वातावरणात आणि उत्साहात साजरा केला.

# सहकारी संस्था बळकटीकरणावर अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे : वळसे-पाटील

## सहकारी संस्था ग्रामीण आर्थिक विकासाचा पाया

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सहकारी संस्था ग्रामीण आर्थिक विकासाचा पाया आहेत आणि युवकांना रोजगार देण्याचे सहकार हे उत्तम माध्यम असल्याने अधिकाऱ्यांनी सहकारी संस्थांच्या बळकटीकरणावर भर द्यावा, असे आवाहन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले. हॉटेल आर्किड येथे आयोजित राज्यस्तरीय सहकारी अधिकारी परिषदेत ते बोलत होते. कार्यक्रमाला सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, साखर आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे कार्यकारी संचालक दिपक तावरे आदी उपस्थित होते. वळसे पाटील म्हणाले,भारत सरकारकडून सहकार कायद्यात सुधारणा करण्यात येणार असून नवीन कायद्यानुसार अनेक प्रकारचे उपक्रम राबविण्यास परवानगी दिली जाणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या वाढणार आहेत. अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जाऊन सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. शासनाच्या योजना विविध माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. सहकार क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी अधिकाऱ्यां बरोबरच संचालक मंडळ, सचिव यांनाही प्रशिक्षण द्यावे, असे सांगितले. सहकार मंत्री म्हणाले, सहकाराच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, आर्थिक प्रगती होऊ शकते. अधिकाऱ्यांनी रचनात्मक काम करुन सामान्य सभासदांचा विश्वास संपादन करावा. तक्रारींचा निपटारा



कालमर्यादेत करावा, विशेषतः आदिवासी, डोंगराळ भागातील सोसायट्याना चांगल्या सेवा न मिळाल्याने अडचणीत जातात. जिल्हा बँकांकडून कर्ज वाटप न झाल्यामुळे कुटुंब अडचणीत येतात. बेकायदेशीर सावकारी मोडून काढण्यासाठी कायदा केला आहे, त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे वळसे-पाटील यांनी सांगितले. 'सहकार विभागाच्या भविष्यातील वाटचाल' याविषयी बोलताना राजेश कुमार म्हणाले, सहकार मंत्रालयाच्या निर्देशानुसार सर्व अधिकाऱ्यांनी काम करावे. सहकारी संस्थाच्या सक्षमीकरणासाठी योजना तयार करावी. सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन द्यावे आणि त्याविषयी संस्थांना मार्गदर्शन करावे. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे संगणकीकरण करावे. 'सहकार संवाद' युट्युब

### सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घ्या

**» अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जाऊन सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. शासनाच्या योजना विविध माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. सहकार क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी अधिकाऱ्यां बरोबरच संचालक मंडळ, सचिव यांनाही प्रशिक्षण द्यावे, असे सांगितले. सहकार मंत्री म्हणाले, सहकाराच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, आर्थिक प्रगती होऊ शकते. अधिकाऱ्यांनी रचनात्मक काम करुन सामान्य सभासदांचा विश्वास संपादन करावा.**

वाहिनीद्वारे विविध विषयांची माहिती प्रसारित करावी, बचत गटांना पॅक्समार्फत मार्केटिंगची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. पणन, सहकार व महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळाने समन्वयाने काम करावे असे सांगून ते म्हणाले, भविष्यातील वाटचालीसाठी सहकार क्षेत्रात ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत संस्थांना प्रशिक्षण व संस्था बांधणी, राज्य सहकारी संसाधन संस्था निर्मिती, ऑनलाईन प्रशिक्षण, कार्यशाळा घेणे असे उपक्रम घेण्यात येणार आहेत. प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाद्वारे आदर्श प्राथमिक कृषी पतसंस्था उभारण्याचा प्रयत्न करावा. सहकार क्षेत्राला चालना देण्यासाठी सहकार विकास व संशोधन प्रबोधिनी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# ५ हजार ८७७ वाहनचालकांचा थकीत दंड कमी

## वाहनचालकांना उद्या पुन्हा एक संधी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंड प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांसाठी सुरू करण्यात आलेल्या मदत केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत पाच हजार ८७७ वाहनचालकांचा दंड कमी करण्यात आला. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियम उल्लंघनाचे थकीत खटल्यांचा निपटारा करण्यासाठी शनिवारी (९ सप्टेंबर) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोकअदालतीचे कामकाज शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून सुरु होणार आहे. वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंडाचे प्रमाण मोठे आहे. थकीत दंडाची रक्कम कमी करणे, तसेच वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेकडून २८ ऑगस्टपासून वाहनचालकांसाठी मदत केंद्र (हेल्प डेस्क) सुरू करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत मदत केंद्राचे कामकाज सुरू राहणार आहे. आतापर्यंत पाच हजार ८७७ वाहनचालकांवरील थकीत



दंड कमी करण्यात आला आहे. प्रलंबित खटला, थकीत दंडाची रक्कम कमी करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. वाहनचालकांना दंडाच्या रकमेतून सूट देण्यात येणार आहे. मदत केंद्रात न्यायालयातील पॅनल असणार आहे. मदत केंद्रात थकीत दंड कमी करून घेण्यासाठी येणाऱ्या वाहनचालकांनी आधारकार्डची झेरॉक्स प्रत आणावी, असे आवाहन वाहतूक पोलीस आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. लोकअदालतीत जास्तीत जास्त खटल्यांचा निपटारा करण्यासाठी १९ न्यायदंडाधिकारी, सहकारी उपस्थित राहणार आहेत. येरवडा येथील वाहतूक शाखेचक्या कार्यालयात

### वाहनचालकांसाठी मदत केंद्र

**» लोकअदालतीचे कामकाज शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून सुरु होणार आहे. वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंडाचे प्रमाण मोठे आहे. थकीत दंडाची रक्कम कमी करणे, तसेच वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेकडून २८ ऑगस्टपासून वाहनचालकांसाठी मदत केंद्र (हेल्प डेस्क) सुरू करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत मदत केंद्राचे कामकाज सुरू राहणार आहे. आतापर्यंत पाच हजार ८७७ वाहनचालकांवरील थकीत दंड कमी करण्यात आला आहे.**

शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून कामकाज सुरू करण्यात येणार आहे. १९ मदत केंद्र तेथे असणार आहेत. प्रथम येणाऱ्या वाहनचालकास प्राधान्य देण्यात येणार आहे. वाहनचालकांना टोकन देण्यात येणार आहे. मदत केंद्राद्वारे आतापर्यंत वाहनचालकांना दंडाच्या रक्कमेतून ५० टक्के सवलत देण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिली.

# दोन नवीन अतिउच्चदाब उपकेंद्रांना महावितरणची मंजूरी

## भोसरी, चिंचवड एमआयडीसी, आळंदी, धानोरी, लोहेगावसह २० गावांना फायदा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

दिवसेंदिवस विजेची व नवीन वीजजोडण्यांची वाढती मागणी तसेच सद्यस्थितीत असलेल्या वीजयंत्रणेवरील भार कमी करण्यासाठी प्रस्तावित चऱ्होली येथील २२०/३३/२२ केव्ही प्राईड वर्ल्ड सिटी, मोशी येथील २२०/२२ केव्ही सफारी पार्क हे दोन नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्यास तसेच भोसरी येथील २२०/२२ केव्ही सेन्चुरी एन्का उपकेंद्रात ५० एमव्हीएचे दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर लावण्यास महावितरणकडून नुकतीच मंजूरी देण्यात आली आहे.

या दोन नवीन अतिउच्चदाब उपकेंद्रांमुळे व एका उपकेंद्राच्या क्षमतावाढीमुळे महापारेषणच्या भोसरी आरएस २२०/२२ केव्ही एक आणि दोन, टेल्को २२०/२२ केव्ही,



मरकळ १३२/३३/२२ केव्ही तसेच सेन्चुरी एन्का २२०/२२ केव्ही या पाच अतिउच्चदाब उपकेंद्रावरील वीजभार मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्राईड वर्ल्ड सिटी (चऱ्होली) व सफारी पार्क (मोशी) येथील नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्यास व सेन्चुरी एन्का (भोसरी) उपकेंद्रांच्या क्षमतावाढीच्या प्रस्तावास नुकतीच मंजूरी दिली आहे. पुढील कार्यवाहीसाठी हा प्रस्ताव महावितरणकडून महापारेषणकडे पाठविण्यात आला आहे. नवीन उपकेंद्र उभारणे व क्षमतावाढ आदींचे काम महापारेषणकडून करण्यात येणार आहे.

दोन नवीन २२० केव्ही क्षमतेचे अतिउच्चदाब उपकेंद्र व एका उपकेंद्राची १०० एमव्हीएने क्षमतावाढ यामुळे पिंपरी चिंचवड शहरासह भोसरी व चिंचवड एमआयडीसी परिसर, चऱ्होली, प्राईड वर्ल्ड सिटी, दाभाडेवस्ती, लोहेगाव, धानोरी, मोशी, आळंदी, जाधववाडी, शिवाजीवाडी, तुपेवस्ती, चिंबळी, केळगाव, डुडळगाव, चोवीसवाडी, वडमुखवाडी, बोऱ्हाडेवाडी यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा केंद्र, विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कचरा डेपो आदींना आणखी दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. वीजपुरवठा खंडित होण्याच्या तांत्रिक प्रमाणात घट होईल तसेच

> “मुख्यालयाने अतिउच्चदाबाचे दोन नवीन उपकेंद्र व एका उपकेंद्राच्या क्षमतावाढीस मंजूरी दिली आहे. त्यानुसार ५० एमव्हीए क्षमतेचे प्राईड वर्ल्ड सिटी उपकेंद्रात चार, सफारी पार्क उपकेंद्रात दोन तर सेन्चुरी एन्का उपकेंद्रात अतिरिक्त दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर्स लावण्यात येतील. यातून तब्बल ४०० एमव्हीएचा वीजभार उपलब्ध होणार आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या पाच अतिउच्चदाब उपकेंद्रांवरील वीजभार कमी होईल. त्याचा दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी पिंपरी चिंचवड शहर, भोसरी एमआयडीसी परिसर आणि सुमारे २० गावांना थेट लाभ होणार आहे.’
>
> **– श्री. राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, पुणे**

काही कारणांमुळे वीज खंडित झाल्यास सक्षम पर्यायी व्यवस्था उपलब्ध होणार आहे. तसेच वीजहानीमध्ये देखील घट होणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या महापारेषण कंपनीच्या भोसरी आरएस एक व दोन तसेच मरकळ, टेल्को व सेन्चुरी एन्का या पाच अतिउच्चदाब उपकेंद्रातून महावितरणच्या ३३ केव्ही व २२ केव्ही क्षमतेच्या एकूण ६६ वीजवाहिन्यांना वीजपुरवठा केला जातो. या सर्व वाहिन्यांचे विभाजन व लांबी कमी करून त्याचा वीजभार नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्राईड वर्ल्ड सिटी व सफारी पार्क २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रावर आणि क्षमतावाढ होणाऱ्या सेन्चुरी एन्का उपकेंद्रावर देण्यात येणार आहे.

# सरकारची इच्छाशक्ती असेल तर सगळं शक्य!

## मराठा आरक्षणासाठी संभाजीराजेंची पुण्यात पत्रकार परिषद

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा आरक्षणाचा विषय पुन्हा एकदा पेटला आहे. मागच्या अकरा दिवसांपासून जालन्याच्या अंतरवाली गावात मनोज जरांगे पाटलांचं उपोषण सुरु आहे. काल सरकारने एक जीआर काढून मराठवाड्यातील मराठा समाजाला निजामकालीन पुराव्यांच्या आधारावर कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेतला. मात्र जरांगे पाटलांची मागणी वेगळी आहे. पुरावे न मागता सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, म्हणजे मराठा समाज ओबीसीमध्ये समाविष्ट होईल, असं ते म्हणत आहेत. त्यावर आज पुन्हा चर्चा होणार आहे. आज रात्री दहानंतर जरांगे पाटलांच्या वतीने एक शिष्टमंडळ मुंबईत येऊन सरकारशी चर्चा करणार आहे. दरम्यान, पुण्यात संभाजीराजे छत्रपती यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला आहे. ते म्हणाले की, मराठा समाजाला पूर्वी मिळालेलं आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकू शकलेलं नाही. २०१९ ला उद्धव ठाकरेंना पत्र पाठवून वकील का बदलता,अशी विचारणा केली होती. त्यावर त्यांनी वकील महागडे आहेत, असं म्हटलं होतं. हे संभाजीराजेंनी सांगितलं. संभाजीराजे पुढे बोलले की, त्यानंतर उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री असतांना आमरण उपोषणाला बसलो होतो. मागासवर्गीय आयोग गठीत करावा लागेल, हे मी १६ फेब्रुवारी २०२२ ला सांगितलं होतं. त्याची प्रत त्यांनी यावेळी दाखवली. ''नंतर एकनाथ




शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर सामाजिक आणि मराठा शैक्षणिक मागास सिद्ध करा, मागासवर्ग आयोग गठण करा, मराठा समाजाचं सर्वेक्षण करा अशी मागणी केली'' या हे तीन टप्पे मराठा आरक्षणासाठी महत्त्वाचे असल्याचं संभाजीराजेंनी स्पष्ट केलं. संभाजीराजे पुढे म्हणाले की, सरकारने ठरवलं तर ते हे करु शकतात. न्यायमूर्ती गायकवाड समितीच्या अहवालाला चॅलेंज होऊ शकत नाही. तो अहवाल चांगला आहे. कोर्टाने मराठा समाजाला फॉरवर्ड क्लास म्हटल्याने आपल्याला मागास सिद्ध करावं लागेल. त्याशिवाय आरक्षण शक्य नाही. जर सरकारची इच्छाशक्ती असेल तर सगळं शक्य आहे. मराठा समाजाला सरकारला जर आरक्षण द्यायचं असेल तर मागासवर्ग आयोग पुनर्गठीत करणं गरजेचं आहे. केंद्रात, राज्यात एकाच विचारांचं सरकार आहे. मागच्या सरकारला

> **आरक्षण द्यायचं असेल तर...**
>
> » मागासवर्गीय आयोग गठीत करावा लागेल, हे मी १६ फेब्रुवारी २०२२ ला सांगितलं होतं. त्याची प्रत त्यांनी यावेळी दाखवली. ''नंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर सामाजिक आणि मराठा शैक्षणिक मागास सिद्ध करा, मागासवर्ग आयोग गठण करा, मराठा समाजाचं सर्वेक्षण करा अशी मागणी केली'' या हे तीन टप्पे मराठा आरक्षणासाठी महत्त्वाचे असल्याचं संभाजीराजेंनी स्पष्ट केलं. संभाजीराजे पुढे म्हणाले की, सरकारने ठरवलं तर ते हे करु शकतात. न्यायमूर्ती गायकवाड समितीच्या अहवालाला चॅलेंज होऊ शकत नाही. तो अहवाल चांगला आहे. कोर्टाने मराठा समाजाला फॉरवर्ड क्लास म्हटल्याने आपल्याला मागास सिद्ध करावं लागेल.

नावं ठेवत होते, आता तर यांचंच सरकार आहे ना? त्यांनी ठरवावं. गायकवाड समितीचा अहवाल फरफेक्ट आहे. कोर्टापुढे त्याचं योग्य सादरीकरण झालं नाही. त्यामुळे आरक्षण टिकलं नाही. मनोज जरांगे यांच्याकडेही तज्ज्ञांची समिती आहे. मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावं, अशी त्यांची मागणी आहे. सरकारने याबाबत पॉझिटिव्ह विचार करणं गरजेचं आहे. आता सरकारने दिशाभूल करु नये, असा इशारा संभाजीराजेंनी दिला.